सत्यमेव जयते

महाराष्ट्राचे राज्यपाल

# डॉ. पी. सी. अलेक्झांडर

यांचे

# अभिभाषण

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

२४ मार्च १९९५

सभापती महोदय, अध्यक्ष महाराज आणि सन्माननीय सदस्य,

नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर होणाऱ्या राज्य विधानमंडळाच्या १९९५ वर्षातील या पहिल्या अधिवेशनात आपले स्वागत करताना मला आनंद होत आहे. विधानसभेच्या नव्याने निवडून आलेल्या सदस्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. माझ्या माहितीप्रमाणे १३५ सदस्य हे प्रथमतःच या सन्माननीय सदनाचे सदस्य झालेले आहेत. निवडून देणाऱ्या जनतेप्रती प्रत्येक निर्वाचित प्रतिनिधीचे उत्तरदायित्व असते व हा संबंध प्रातिनिधिक शासनाचे एक महत्त्वाचे आधारतत्त्व आहे याचे मी आपणास स्मरण देऊ इच्छितो. ह्या जबाबदारीची सातत्याने जाणीव असावयास हवी आणि निर्वाचित प्रतिनिधी व मतदार यांचे संबंध त्यावर आधारित असावयास हवेत. त्यांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आपण सर्वतोपरी झटाल याबद्दल माझ्या मनात तिळमात्र शंका नाही.

२. भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती ग्यानी झैल सिंग यांच्या दुःखद निधनामुळे राज्याची आणि देशाची कधीही भरून येणार नाही अशी हानी झाली आहे. आपणा सर्वांना मी अशी विनंती करतो की, आपण सर्वांनी मिळून त्यांना आदरपूर्वक श्रद्धांजली वाहू या. तसेच दिनांक २३ नोव्हेंबर १९९४ रोजी नागपूर येथे चेंगराचेंगरीची दुःखद घटना घडली त्यावेळी ज्या स्त्री-पुरुषांना आपले प्राण गमवावे लागले त्याबद्दलही मी आपणा सर्वांच्या वतीने दुःख व्यक्त करतो. या वेळी ७१ स्त्रिया, १२ मुले, १२ मुली आणि १८ पुरुष अशा ११३ व्यक्ती मृत्युमुखी पडल्या आणि १०७ व्यक्ती जखमी झाल्या. या सर्वांच्या कुटुंबियांचे सांत्वन करण्यास शब्द अपुरे आहेत. या घटनेची चौकशी करण्यासाठी शासनाने मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. एस. एस. दाणी यांच्या चौकशी आयोगाची नेमणूक केली आहे. चेंगराचेंगरीत मरण पावलेल्यांच्या निकटच्या नातेवाईकांना १ लाख रुपयांची व जखमी झालेल्यांना ५ हजार रुपयांची रोख नुकसानभरपाई देण्याचेही शासनाने जाहीर केले आहे. कायमचे व अंशतः अपंगत्व प्राप्त झालेल्या व्यक्तींसाठीदेखील याच प्रकारच्या सवलती शासनाने जाहीर केलेल्या आहेत.

३. मराठवाड्यातील भूकंपग्रस्तांचे जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने पुनर्वसन करण्याचा एक मोठा कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. या पुनर्वसन कार्यक्रमामध्ये इतर गोष्टींबरोबरच घरे बांधणे, मूलभूत सुविधा पुरवणे, सामाजिक

व आर्थिक पुनर्वसन करणे आणि तंत्रविषयक सहाय्य देणे या कामांचा समावेश आहे. या कार्यक्रमाची त्वरेने अंमलबजावणी करण्यात यत्किंचितही विलंब होणार नाही आणि पुनर्वसनाच्या कार्यक्रमाला अधिक गती मिळेल याची दक्षता घेण्याचा माझे शासन प्रयत्न करील.

४. राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांच्याकरिता विकास मंडळे स्थापन करण्यात आली असून त्यांनी आपापल्या अधिकारक्षेत्रात कामाला सुरुवात केली आहे. ही मंडळे त्यांच्या संबंधित भागांमध्ये निरनिराळ्या क्षेत्रात कितपत विकास झालेला आहे हे अजमावून पाहात आहेत.

५. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांमुळे, १९९५–९६ ची वार्षिक योजना अद्याप निश्चित करता आलेली नाही. माझे शासन आता नियोजन आयोगाशी विचारविनिमय करून १९९५–९६ च्या योजनेची व्याप्ती निश्चित करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करील.

६. अतिवृष्टी आणि पूर यांमुळे राज्यातील आणि विशेषकरून विदर्भ प्रदेशातील, २.७ लाख हेक्टर इतक्या क्षेत्रातील उभी पिके वाहून गेली. त्याचवेळी, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना अवर्षणाला तोंड द्यावे लागले. या नैसर्गिक अडचणी येऊनही राज्यात सुमारे १२५ लाख मेट्रिक टन इतके एकूण अन्नधान्य उत्पादन होईल अशी अपेक्षा आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना वाटणारी चिंता दूर करणे हे शासनाचे धोरण राहील. सध्याची पीक कर्ज विमा योजना प्रभावी नाही असे शासनाला ठामपणे वाटते. म्हणून, भारत सरकारशी विचारविनिमय करून व्यापक स्वरूपाची एक नवीन पीक विमा योजना सुरू करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असून शेतकऱ्यांची साशंकता या योजनेमुळे कमी होईल.

७. राज्यामध्ये सहकार क्षेत्रात आणि खाजगी क्षेत्रात दररोज अंदाजे ३७ लाख लिटर दुधाचे संकलन होत असते. प्राथमिक सहकारी दुग्ध संस्थांच्या संकलन केंद्रांवर आठवड्यात केवळ सहा दिवस दुधाचे संकलन करण्याचे आधीच्या शासनाचे धोरण नसते तर दुधाचे हे संकलन यापेक्षाही अधिक झाले असते. आता हे संकलन आठवड्यातील सर्व दिवशी करण्याचा माझ्या शासनाचा मानस आहे. केवळ राज्यातील लोकांना दूध पुरविण्यासाठीच नव्हे तर दुधाची गरज असलेल्या इतर राज्यांना देखील दूध पाठविण्याचे व तसेच दुधाच्या भुकटीची विदेशात निर्यात करण्याचे प्रयत्न केले जातील.

८. एकाधिकार कापूस खरेदी योजना पुढे चालू ठेवण्यास केंद्र सरकारने मंजुरी न दिल्याने जून १९९५ मध्ये ती योजना बंद होईल. ती योजना पुढे चालू ठेवण्याबाबत केंद्र सरकारचे मन वळवण्याचा माझे शासन सर्वतोपरी प्रयत्न करील

आणि अधिक किफायतशीर किंमत देऊन शेतकऱ्यांना पैसे ताबडतोब मिळतील अशी व्यवस्था करील. त्याचप्रमाणे सहकारी संस्थांच्या भागधारकांना देण्यात येणाऱ्या लाभांशावरील मर्यादा काढून टाकण्यासाठी माझे शासन खास प्रयत्न करील. त्यामुळे या भागधारकांनी पत्करलेल्या जोखमीच्या बदल्यात त्यांना पुरेसा मोबदला मिळू शकेल. सहकारी चळवळीमुळे ग्रामीण क्षेत्राला बराच लाभ झाला या गोष्टीची माझ्या शासनाला पुरेपूर जाणीव आहे, असे असले तरी, या सहकारी चळवळीच्या क्षेत्रात आर्थिक शिस्त आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचाही माझे शासन प्रयत्न करील.

९. महाराष्ट्र हे देशातील अग्रगण्य औद्योगिक राज्य आहे. संपूर्ण जगातून बरीच मोठी गुंतवणूक या राज्यात झालेली आहे. माझे शासन उद्योगपतींकडून होणाऱ्या नवीन गुंतवणुकीचे स्वागत करील व महाराष्ट्र राज्य हे औद्योगिक गुंतवणुकीचे एक आकर्षक केंद्र होईल या दृष्टीने प्रयत्नशील राहील. आपले सध्याचे औद्योगिक धोरण केंद्र सरकारच्या उदार औद्योगिक धोरणाशी अधिक सुसंगत असावे यासाठी त्यात फेरबदल करण्याचा माझ्या शासनाचा मानस आहे. राज्यात नव्याने उभारल्या जाणाऱ्या उद्योगांच्या सर्व गरजा व समस्यांचे निवारण एकाच ठिकाणी करण्याचा दृष्टिकोन हे आमच्या धोरणाचे मूलतत्त्व असेल. औद्योगिक विकासाच्या बाबतीत राज्याचे अग्रगण्य स्थान टिकवून ठेवण्याचा शासनाचा संकल्प असून याविषयी कोणाच्याही मनात शंका असू नये.

१०. व्यवस्थापनामध्ये कामगारांना सहभागी करून घेण्याच्या धोरणास शासन वचनबद्ध आहे. कायद्याच्या अभिलेखातून मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम रद्द करून त्याऐवजी कामगारांचे हित पूर्णपणे सुरक्षित राहील असा एक नवीन कायदा करण्याचेही माझ्या शासनाने योजले आहे. असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या समस्यांकडेही शासन बारकाईने लक्ष पुरवणार आहे.

११. वीजनिर्मितीच्या बाबतीत महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर राहिलेला आहे. टाटा आणि मुंबई उपनगर वीज पुरवठा कंपनी यांच्या हिश्श्याची व सेंट्रल ग्रिडकडून मिळणारी वीज धरून राज्यातील विजेची स्थापित क्षमता १०,८९३ मेगॅवॉट इतकी आहे. या शतकाच्या अखेरपर्यंत वीजनिर्मितीची स्थापित क्षमता सुमारे ७,००० मेगॅवॉटनी वाढवण्याचा प्रस्ताव आहे. यामध्ये खाजगी क्षेत्रामार्फत होणाऱ्या वीजनिर्मितीचा समावेश आहे. कोकणातील दाभोळ वीज प्रकल्पाच्या बाबतीत उद्भवलेल्या वादामुळे हा प्रकल्प राज्याच्या विकासाच्या दृष्टीने कितपत हितकारक आहे हे पाहण्यासाठी या प्रकल्पाचा सविस्तर आढवा घेण्याचा शासनाचा विचार आहे.

यापुढे नवीन वीजनिर्मिती प्रकल्पांच्या संबंधात कोणतेही करार स्पर्धात्मक निविदा मागविल्याशिवाय करण्यात येणार नाहीत.

१२. राज्यातील मूलभूत सुविधांच्या सर्वांगीण विकासासाठी चांगल्या दर्जाचे रस्ते ही एक अत्यावश्यक गोष्ट आहे. एक हजारापेक्षा अधिक लोकसंख्या असलेली सर्व गावे टप्प्याटप्प्याने बारमाही रस्त्यांनी जोडण्याचे माझ्या शासनाने ठरवले आहे. मुंबई-पुणे, मुंबई-नाशिक, मुंबई-सावंतवाडी, मुंबई-तलासरी यांसारख्या महत्त्वाच्या मार्गांवर सहा पदरी वळणरहित मार्ग बांधण्याचेही योजले आहे. या प्रकल्पांमध्ये खाजगी क्षेत्रालाही सहभागी करून घेण्याचा माझ्या शासनाचा उद्देश आहे. वाहतुकीची कोंडी होऊ नये आणि रस्त्यावरील व रेल्वेची वाहतूक सुरळीतपणे सुरू राहावी म्हणून मुंबई महानगर क्षेत्रात उड्डाणपूल बांधण्याचे ठरवण्यात आले आहे.

१३. राज्यातील पाटबंधाऱ्यांच्या संतुलित विकासास माझे शासन सर्वोच्च अग्रक्रम देणार आहे. यासंबंधात माझे शासन पूर्वीच मान्यता मिळालेल्या प्रकल्पांचा सांगोपांग आढावा घेईल व जास्तीत जास्त लाभधारकांना फायदा मिळेल अशा योजना ठराविक मुदतीत पूर्ण करण्यासाठी त्यांना पुरेसा निधी दिला जाईल याची खात्री करून घेईल. यामुळे पाटबंधाऱ्यांच्या बाबतीत मागासलेल्या क्षेत्रांकडे अधिक लक्ष पुरवले जाईल. लवादाच्या निर्णयानुसार इ. स. २००० पूर्वी राज्याला उपलब्ध होणाऱ्या कृष्णा खोऱ्यातील पाण्याचा पुरेपूर वापर करून घेणे आवश्यक आहे याची माझ्या शासनाला जाणीव आहे आणि यासाठी पुरेसा निधी पुरवण्याचा आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू.

१४. रोजगार हमी योजना, जवाहर रोजगार योजना व इतर तत्सम योजना यांसारख्या ग्रामीण रोजगार कार्यक्रमांची संपूर्ण राज्यात जोमाने अंमलबजावणी करण्यात येईल. पाणलोट क्षेत्र विकासावर भर देणारा एक नवीन अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रम हाती घेण्याचे उद्दिष्ट भारत सरकारने नजरेसमोर ठेवले आहे. १ एप्रिल १९९५ पासून १४८ गटांमध्ये या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. एकात्मीकृत पाणलोट क्षेत्र कार्यक्रमाखाली १९९५-९६ या वर्षात अनेक गावांना या योजनेचा लाभ देण्याचे प्रस्तावित आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये स्वयंसेवी संघटनांना सक्रिय रीतीने सहभागी करून घेण्यात येईल.

१५. अनुसूचित जातींचा व समाजातील इतर वंचित घटकांचा दर्जा सुधारण्यास माझे शासन वचनबद्ध आहे. गरीब व गरजू लोकांना झुणका-भाकर देण्याची योजना सुरू करण्याचे ठरवले आहे. गोवारी समाजाचा अनुसूचित जमातींमध्ये समावेश करण्यासंबंधीच्या प्रश्नाबाबत केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे. वृद्ध व वयस्क व्यक्तींची खास काळजी घेण्याकरिताही विशेष योजना सुरू करण्यात येईल.

१६. आदिवासी कल्याण योजनांसाठी पुरेशा प्रमाणात खर्चाची तरतूद करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न राहील आणि त्यात कृषी, रोजगार, आरोग्यसेवा, शिक्षण, रस्त्यांचा विकास आणि ग्रामीण पाणीपुरवठा या योजनांसारख्या, आदिवासींचे राहणीमान सुधारणाऱ्या बाबींना अग्रक्रम दिला जाईल. राज्यातील आदिवासी

भागातील कुपोषणाची समस्या हाताळण्याकरिता "नव-संजीवन योजना" नावाची नवीन योजना सुरू करण्याचे माझ्या शासनाने ठरविले आहे.

१७. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची ढासळती स्थिती आणि विशेषतः, महिलांच्या संबंधात घडणारे अपराध यांविषयी माझ्या शासनाला अतिशय चिंता वाटते. म्हणून, महिलांच्या संबंधातील अत्याचार व अपराध यांचे खटले चालवण्यासाठी विशेष न्यायालये स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे. विविध क्षेत्रांमध्ये स्त्रियांच्या आरक्षणाचे धोरण जोमाने राबवण्याचेही योजलेले असून त्याचा आरंभ पोलीस खात्यातील भरतीपासून करण्यात येईल. महिलांसाठी सर्वत्र सार्वजनिक प्रसाधनगृहांची व्यवस्था केली जाणे आवश्यक आहे. त्यासंबंधी एक योजना लवकरच तयार केली जाईल.

१८. या वर्षात कोकण रेल्वे प्रकल्पाच्या कामात बरीच प्रगती झाली असून १९९५ या वर्षात मालवाहतूक व प्रवासी वाहतुकीसाठी ती रेल्वे खुली होईल अशी अपेक्षा आहे. मानखुर्द-बेलापूर रेल्वेमार्ग पनवेलपर्यंत वाढवणे, ठाणे-तुर्भे-नेरुळ-वाशी रेल्वेमार्ग आणि नेरुळकडे जाणाऱ्या फाट्यासह बेलापूर-उरण रेल्वेमार्ग ही कामे अग्रक्रम देऊन हाती घेण्याचा माझे शासन सर्वतोपरी प्रयत्न करील.

पनवेल व कर्जत यांमधील रेल्वे जोडमार्गाचा अभ्यास करण्याचेही रेल्वे प्राधिकरणांनी मान्य केले आहे.

मुंबई नागरी परिवहन प्रकल्प-दोन यासंबंधात जागतिक बँकेशी वाटाघाटी चालू असून या प्रकल्पासंबंधात सखोल प्राथमिक अभ्यास करण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन हा या प्रकल्पाचा अविभाज्य भाग असेल. यासाठी व्यापक योजना आखण्यात येत आहे.

१९. भारत सरकारने बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मुंबई महानगर प्रदेशातील इतर महानगरे यांच्याकरिता ५ वर्षांच्या कालावधीसाठी ८०० कोटी रुपयांच्या मेगासिटी कार्यक्रमाला मान्यता दिली आहे. १९९५-९६ या वर्षी देखील ही योजना प्रभावीपणे राबवण्यात येईल. विशेषतः मुंबई शहराला भेडसावणाऱ्या प्रचंड समस्या लक्षात घेतल्यानंतर शासनाला असे वाटते की, या शहराच्या गुंतागुंतीच्या अगणित समस्या सोडवण्यासाठी केंद्र सरकार पुरेसा निधी उपलब्ध करून देत नाही. म्हणून, अधिक निधी मिळविण्यासाठी केंद्र सरकारकडे या प्रश्नाचा पाठपुरावा करण्याचे माझ्या शासनाने योजले आहे. इतर महानगरांच्या विकासाकडेही शासन तितकेच लक्ष पुरवणार आहे.

२०. राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांच्या समस्या हाताळण्यासाठी माझे शासन एक योजना आखणार आहे. किफायतशीर रोजगार किंवा योग्य उपक्रमांच्या रूपाने स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी शासन एक विधायक स्वरूपाची योजना सुरू करील.

२१. एक कालबद्ध कार्यक्रम आखून राज्यातील सर्व गावांमध्ये, पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या कामास माझ्या शासनाने सर्वप्राथम्य दिलेले आहे. या वर्षी राज्य योजनेखाली या कार्यक्रमासाठी खर्चाची भरीव तरतूद करण्यात येईल.

कल्याण-डोंबिवली, ठाणे-भिवंडी, अंबरनाथ-भाईंदर, वसई-विरार आणि आसपासची अन्य गावे यांच्याकरिता तसेच नव्या मुंबईकरिता नागरी पाणीपुरवठा योजनांना अंतिम रूप देण्यात येईल आणि हे प्रकल्प जागतिक बँकेपुढे विचारार्थ मांडण्यात येतील. काम सुरू असलेल्या योजनांपैकी अमरावती, धुळे, नागपूर, सोलापूर, अहमदनगर, अकोला, बार्शी-कुर्डूवाडी आणि कल्याण-डोंबिवली येथील प्रकल्प पूर्ण करण्याच्या कामास अग्रक्रम देण्यात येईल.

२२. माझ्या शासनाच्या धोरणाचा एक भाग म्हणून प्राथमिक शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल. सर्वांना प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या राज्य योजनेसंबंधात विशेष कार्यगटाने केलेल्या शिफारशी शासनाने स्वीकारल्या आहेत. १०० टक्के पटनोंदणी करणे, विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी करणे व प्राथमिक शिक्षणाच्या दर्जात सुधारणा करणे ही या कृति-कार्यक्रमाची उद्दिष्टे आहेत.

शिक्षकांच्या तक्रारींचे त्वरित निवारण करण्यासाठी शाळा न्यायाधिकरणाची यंत्रणा अधिक बळकट करण्याचे आम्ही ठरवले असून कॅपिटेशन फी विरोधी अधिनियमाची प्रभावीरीत्या अंमलबजावणी करण्यात येईल. माझे शासन विना-अनुदान संस्थांच्या कामकाजाचा आढावा घेईल आणि शिक्षणाचा दर्जा राखला जावा म्हणून त्यांच्या कामकाजात सुधारणा करण्यासाठी योग्य ती उपाययोजना करील.

२३. उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचा प्रश्न काही काळापासून शासनाच्या विचाराधीन आहे. यादृष्टीने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ हा कायदा केला आहे. या कायद्याद्वारे विद्यापीठाच्या कामात सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न केला जात आहे व तसेच विद्यापीठांचे प्रशासन, अध्यापक व विद्यार्थीवर्ग यांत शिस्त आणण्यास मदत होणार आहे. माझ्या शासनाने एक स्वतंत्र क्रीडा संस्था स्थापन करण्याच्या प्रस्तावाबाबत विचार करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्याचे ठरविले आहे. ही संस्था आधुनिक क्रीडा सामग्रीने सुसज्ज असेल व त्यामध्ये क्रीडा शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचा व क्रीडा वैद्यक पद्धतीचा विकास करण्याची सोय असेल.

२४. मुंबईत आणि राज्यातील अन्य काही शहरांमध्ये असलेली घरांची तीव्र टंचाई लक्षात घेऊन, अधिक निवासी जागा उपलब्ध करणे सोयीचे व्हावे यासाठी एक कृति-योजना तयार करण्यात येत आहे. त्यामध्ये इतर उपाययोजनांबरोबर, सध्याच्या कायद्याच्या तरतुदींमध्ये योग्य ते बदल करण्याचाही समावेश असेल. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या प्रदेशांना लागू असलेल्या विद्यमान अधिनियमांच्या जागी नवीन अधिनियम करणारे एकत्रित भाडे नियंत्रण विधेयक या विधानमंडळासमोर प्रलंबित आहे. आपण सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाचे महत्त्व जाणून शक्य

तितक्या लवकर त्याचा मसुदा अंतिमरीत्या निश्चित करावा असे मी आवाहन करीत आहे.

२५. राज्याच्या काही भागात गाठीच्या प्लेगची साथ पसरली होती. भविष्यकाळात अशी परिस्थिती उद्‌भवल्यास शासनाला तिचा मुकाबला करता यावा म्हणून प्लेग संनिरीक्षण युनिट पुन्हा सुरू करण्यात आले असून मुंबई येथील हाफकिन संस्था आणि पुणे येथील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभाग या ठिकाणी प्लेगच्या संबंधात तपासणी व चिकित्सा करण्यासाठी दोन केंद्रे स्थापन करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. गाव समूहांना सर्व प्रकारच्या सर्वसाधारण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी माझ्या शासनाने प्राथमिक आरोग्य केंद्रांवर आणि ग्रामीण रुग्णालयांमध्ये सध्या पुरविण्यात येणाऱ्या सुविधांची व्याप्ती आणि त्यांत समाविष्ट असलेल्या बाबींचा आढावा घेण्याचे ठरविले आहे. तसेच, माझ्या शासनाने जिल्हा पातळीवर कर्करोग, कुष्ठरोग आणि एड्स यांचे निदान व त्यांवर उपचार करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याचे ठरविले आहे. माझे शासन ' दृष्टिदान ' ही एक नवीन योजना सुरू करणार आहे. यामध्ये, सध्याच्या योजनेची व्याप्ती वाढवून मोतीबिंदू शस्त्रक्रियेबरोबरच डोळ्यांच्या इतर विकारांसाठी आवश्यक असलेल्या शस्त्रक्रियांचा समावेश करण्यात येऊन ही योजना दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी राबविण्यात येईल.

२६. आंतरराष्ट्रीय पर्यटनाइतकेच देशांतर्गत पर्यटन महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील गडकिल्ले आणि ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व असलेली अन्य स्मारकशिल्पे सुस्थितीत ठेवण्यासाठी आणि त्यांची दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी तसेच, या ठिकाणापर्यंत लोकांना सहज पोहोचता यावे याकरिता वाहतुकीच्या योग्य त्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी एक खास यंत्रणा स्थापन करण्याचा माझ्या शासनाचा मानस आहे. राज्यातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांचा विकास करून यात्रेकरूंसाठी सुविधा पुरवण्यात येतील.

२७. शासनाने पोलीस दलाचे सामर्थ्य व क्षमता वाढवण्याचे योजले असून त्यासाठी पोलीस दलाला आधुनिक वाहने व अत्याधुनिक शस्त्रास्त्रे पुरवण्यात येतील आणि त्यांना खास प्रशिक्षण देऊन त्यांची कार्यक्षमता वाढवण्यात येईल. पोलिसांसाठी योग्य निवासस्थानांचीही व्यवस्था करण्यात येईल. पोलिसांना ज्या विशेष परिस्थितीत काम करावे लागते ती, वेतन आयोगाने त्यांचे पगार व भत्ते वाढवताना विचारात घ्यावी, हे त्यांना पटवून देण्याचा शासन प्रयत्न करील. पोलीस यंत्रणा आणि प्रशासनातील अधिकारी वर्ग यांच्यातील भ्रष्टाचारी प्रवृत्तीविरुद्ध कठोर मोहीम उघडण्यात येईल व भ्रष्टाचार करणाऱ्यांना कोणतीही दया न दाखवता त्यांच्याविरुद्ध कठोर कार्यवाही करण्यात येईल. बेकायदेशीर स्थलांतर करून आलेले विदेशी नागरिक दीर्घकाळपासून राज्यात राहात आहेत या गोष्टीची शासनाला चिंता वाटत असून या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी आवश्यक ते सर्व उपाय योजण्यात येतील.

त्याचप्रमाणे, शांतताप्रिय आणि कायद्याचे पालन करणाऱ्या नागरिकांना निर्भयपणे वावरता यावे म्हणून शासन वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी प्रभावी उपाय योजील.

२८. १९९ पाटबंधारे प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या सुमारे १,४८,३७५ शेतकऱ्यांचे ८७.९२ कोटी रुपये इतका अंदाजित खर्च करून वसवण्यात येणाऱ्या १,०६० नवीन गावठाणांमध्ये पुनर्वसन करण्यात येत आहे.

२९. बराच काळ अनिर्णीत राहिलेल्या महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंबंधात महाराष्ट्रातील तमाम जनतेने आपल्या पक्षनिष्ठा आड येऊ न देता एकदिलाने प्रयत्न करूनदेखील त्यावर अद्यापही तोडगा निघालेला नाही. गेल्या वर्षी आयोजित केलेल्या सर्वपक्षीय बैठकीत या समस्येचा पुन्हा आढावा घेऊन एक अभ्यास गट स्थापन करण्याचे ठरवण्यात आले. या अभ्यास गटाने केंद्र सरकारकडे या प्रश्नाचा पाठपुरावा करण्याची शिफारस केली. मुख्य मंत्री आणि उप मुख्य मंत्री यांनी १६ मार्च रोजी पंतप्रधानांची जेव्हा भेट घेतली तेव्हा त्या पहिल्या भेटीतच माझ्या शासनाने हा प्रश्न विनाविलंब त्यांच्यासमोर मांडला आहे. बराच काळ अनिर्णीत असलेला हा प्रश्न सोडवण्यास माझे शासन वचनबद्ध आहे.

३०. शासनापुढे इतरही अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत. त्यांपैकी सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, दैनंदिन प्रशासनात साध्या सोप्या मराठीचा वापर करण्याचे धोरण काटेकोरपणे राबवणे हा आहे. तसेच, माझे शासन न्यायालयाच्या प्रशासनात मराठीचा वापर करण्याविषयी उच्च न्यायालयाशी चर्चा करणार आहे. संपर्काची भाषा जशी महत्त्वाची आहे तसेच संपर्काचे माध्यमही महत्त्वाचे आहे. जनसामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी इलेक्ट्रॉनिक माध्यम हे एक प्रभावी साधन असल्यामुळे राज्य शासनाला या साधनांचा अधिकाधिक वापर करता यावा असे माझ्या शासनाला वाटते. माझ्या शासनाने, शिक्षणाचा प्रसार करण्याकरिता, शेतकऱ्यांना माहिती पुरवण्याकरिता आणि राज्यातील विकास यंत्रणांमध्ये कार्य करणाऱ्या लोकांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता या माध्यमाचा वापर करण्याचे ठरवले आहे. त्याकरिता "माय मराठी वाहिनी" सुरू करण्याची आमची इच्छा आहे.

३१. सन्माननीय सदस्य, माझे शासन वचननाम्यात दिलेली जास्तीत जास्त आश्वासने अल्पावधीत पूर्ण करण्यास उत्सुक आहे आणि हे काम अवघड आहे, हे आपण मान्य कराल. विधानमंडळाचे सर्व सदस्य नव्या शासनाला मनःपूर्वक सहकार्य देतील अशी माझी खात्री आहे. त्यामुळे शासनाला जनमताचा आदर ठेवून आपली कर्तव्ये दक्षतेने व जबाबदारीने पार पाडणे शक्य होईल.

मी पुन्हा एकदा आपणा सर्वांचे हार्दिक अभिनंदन करतो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई